कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक २८/१०/२०१७

मा. पोलीस अधिक्षक यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्रि, जुगार, मटका, सट्टा अशा प्रकारचे बेकायदेशिर व्यवसाय करणा-या व्यवसयीकांवर आळा घालण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी /कर्मचारी यांचेवर जबाबदारी सोपविलेली असता, हॅलो गडचिरोली या दैनीक वृत्तपत्रामध्ये सट्टापट्टि मटका जुगारासंबधात बातमी प्रकाशीत झाली असता, सदरची जबाबदारी पार पाडतांना स्थानिक गुन्हे शाखेमधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी आप-आपले गोपनिय बातमीदार सक्रिय करुन गडचिरोली जिल्हयातील अवैध व्यवसायांसंबधात माहिती घेतली असता, गोपनिय सुत्राकडुन विश्वसनियरित्या माहिती मिळाली कि, मौजा कुरखेडा ता. कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथील सट्टापट्टि मटका जुगार चालविणारा नामे अनिल लक्ष्मणदास माखीजा हा मौजा कोढाळा येथील चौकात सार्वजनीक ठिकाणी मटका जुगाराचा डावा मांडुन स्वतः तसेच स्वतःचे इतर एजंट तयार करुन त्यांच्या मार्फतीने लोकांकडुन पैसे घेवुन त्यांना मटका जुगाराचे आकडे लिहुन देवुन त्यावर हारजितचा डाव मांडला असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजा कोंढाळा येथे मटका जुगार रेड संबधाने कायदेशिर कारवाई करण्यासंबधात मा. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांना पुर्वकल्पना देवुन त्यांचे आदेशान्वये तसेच मा. महेंद्र पंडीत, अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली मटका जुगार रेड करीता पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक प्रदिप लांडे, हे स्वतः सोबतचे पोलीस पथकामधील भाऊराव बोरकर, नरेश सहारे, दुधराम चवारे, प्रशांत पातकमवार, अशा प्रकारे पोलीस पथक तयार करुन योग्य प्रकारे सापळा रचुन गोपनियता व नक्षल सुरक्षीतता बाळगुन पो.स्टे देसाईगंज अतर्गत मौजा कोंढाळा येथे पोहचुन नामे अनील लक्ष्मणदास माखीजा याचे अधिपत्या खाली मटका जुगार चालु असलेल्या ठिकाणी रेड केला असता, त्या ठिकाणी नामे १) ईश्वर सुखदेव शेंडे वय ३५ वर्षे रा. कोंढाळा २) शरद लक्ष्मण शेंडे वय २९ वर्षे रा. कोंढाळा हे स्थानिक लोकांकडुन मटका जुगाराचे डावाकरीता पैसे घेत असतांना मिळुन आले, यातील आरोपी क्र १ व २ यांचे ताब्यात जुगाराचे डावातील रोख रक्कम ७३५०/- व इतर आवश्यक साहित्य असे एकुन ७३६०/ रुपयाचा मुद्देमाल जप्ती केला. बेकायदेशिररित्या मटका जुगाराचा डावा चालविणारा इसम नामे अनिल लक्ष्मण माखीजा रा. कुरखेडा तसेच त्याचे प्रतिनीधी नामे ईश्वर सुखदेव शेंडे वय ३५ वर्षे रा. कोंढाळा २) शरद लक्ष्मण शेंडे वय २९ वर्षे रा. कोंढाळा यांचे विरुध्द पोलीस स्टेशन देसाईगंज येथे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंद करुन कायदेशिर कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेकडुन झालेल्या कारवाई मुळे पो.स्टे देसाईगंज अतंर्गत चालु असलेल्या अवैध मटका जुगार चालविणा-या लोकांवर अंकुश बसला असुन त्यांचे धाबे दणालेले आहेत.